दिनांक १२/०३/२०२३ अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि.१२ /०३/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा

एकुण गुन्हे:— १७ उघडकीस :—०० मर्ग :—०३

दुखापत :—०३ (पान क्र ०१)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप.नं. १९६/२३ कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भा. दं.वि. | ग्राम म्हसला, रायसोनी कॉलेज जवळ, अंजनगाव बारी रोड, अमरावती. | घटना ता.वेळ - दि. १०.०३.२३ चे २२.३० वा. माहीती मिळाल्याची वेळ - दि. ११.०३.२३ चे १०.३० वा दाखल ता. वेळ - दि. ११.०३.२३ चे ११.१२ वा. | एक महीला | १)विशाल भिमराव गायकवाड, वय ३० वर्षे, २) विशालचा मोठा भाऊ दोन्ही रा. ग्राम म्हसला, रायसोनी कॉलेज जवळ, अंजनगाव बारी रोड, अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात शेजारी शेजारी राहत असुन नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या खाली जागेमध्ये त्याची मोटरसायकल उभी केली म्हणुन फिर्यादीचे नातेवाईक यांनी त्याला येथे तु येथे गाडी लावु नको व आमच्यासोबत बोलु नको, असे म्हटले. त्या कारणारून आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या नातेवाईकासोबत वाद घालुन त्यांना शिवीगाळ करून त्याच्या हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या नातेवाईकाच्या डोक्याला मागील बाजुस व पाठीवर मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपी क्र. २ याने फिर्यादीस व तिच्या नातेवाईकास शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून व मेडीकल सर्टी.वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |
| २ | बडनेरा अप.नं. १९७/२३ कलम ३२५,३२६, ५०४, ५०६, भा. दं.वि. | फि.चे घराजवळ ग्राम म्हसला, रायसोनी कॉलेज जवळ, अंजनगाव बारी रोड, अमरावती | घटना ता.वेळ - दि. १९.०२.२३ चे २३.०० वा. माहीती मिळाल्याची वेळ - दि. ११.०३.२३ चे १६.०० वा दाखल ता. वेळ - दि. ११.०३.२३ चे १७.२९ वा | सतिश वासुदेवराव लांजेवार वय २८ वर्ष रा म्हसला ता जि अमरावती ,तर्फे चौकशी अधिकारी पोहेका रहीम अब्दुल ब.न.२२ पो.स्टे बडनेरा | आशिष नारायण निकाळे वय २६ वर्षे रा म्हसला, रायसोनी कॉलेज जवळ, अंजनगाव बारी रोड, अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठीकाणी जखमी हा दि १९/०२/२०२३ रोजी रात्री.११.०० घरासमोरील अंगणात रस्त्यावर बसला असता त्याचे घरासमोर राहणारा आरोपी इसम नामे आशिष नारायण निकाळे वय २६ वर्षे रा म्हसला, रायसोनी कॉलेज जवळ, अंजनगाव बारी रोड, अमरावती याने तु दारु पीवुन माझ्या घरासमोर का बसला या कारणावरुन वादविवाद करुन लाथाबुक्यांनी व हातात असलेल्या लोखंडी पाईपने डाव्या हातावर मारुन जखमी केले शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली पोलीसात तक्रार दिली तर पुन्हा मारेन असे म्हटले नमुद रुग्ण हा वार्ड क्र. १५ जि. सामान्य रुग्णालय येथे स्वत उपचाराकरीता दाखल झाला होता दि. २०.०२.२०२३ रोजी जख्मी बाबत पोस्टे बडनेरा येथे माहीती प्राप्त झाल्यावरुन पोहेका नितीन गावंडे ब.न.२१६ यांनी रुग्णालयात जावुन त्यांचे बयान नोंदवीले व वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त केले त्यावेळी पोस्टैला परत आल्यावर डि ओ पोउपनि शामसुंदर तायडे यानी सदर बयान बाबत एक्सरे रिपोट प्राप्त झाल्यावर कारवाही करण्याची तजवीज ठेवली आहे असा रिमार्क केला व तशी स्टे.डा नोंद क्र.२४/२०२३ दि.२०.०२.२०२३ चे १४.०१ वा अन्वये नोंद करण्यात आली त्याबाबत चौकशी करुन एक्सरे रिपोट आज दि. ११.०३.२०२३ रोजी प्राप्त केले असता जख्मीचे डाव्या हाताचे हाड मोडले असुन तो आजपोवेतो उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे वॉड क्र.१५ येथे आंतर रुग्ण म्हणुन दाखल आहे तसेच जख्मीची नातेवाईक हिचे बयान नोंदवीण्यात आले अशा जख्मीच्या दि. २०.०२.२०२३ रोजी नोंदविलेले बयान व एक्सरे व मेडीकल रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा कलम ३२५,३२६, ५०४, ५०६, भा. दं.वि. चा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | राजापेठ अप क्रं-२६०/२३ कलम ३२४,५०४, ५०६ भादवी | जेवड नगर , गल्ली क्र. २ अमरावती | घ.ता.वेळ -दि. १०/०३/२३ चे १२/३० वा. ते १६.३० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ - दि.११/०३/२३ चे ००/३२ वा | एक महीला | एक महीला | हकीकत अश्या प्रकारे आहे की, नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी आरोपीने फि.च्या नातेवाईकाचे मोबाईलवर कॉल करुन शिवीगाळ केली व फि चे घरासमोर येवुन फि.चे केस ओढुन डावे डोळयाजवळ डोके मारले व डावे हाताचे करंगळीजवळ चावा घेतला अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

जबरी चोरी :—०१(पान क्र ०३)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३४५/२०२३ कलम ३९२,५०६,३४ भादवी | पॉलीटेक्नीक कॉलेज च्या गेटजवळ अमरावती | घटना ता.वेळ दि .१०.११.२०२३ चे २२.३० वा<br><br>दा.ता.वेळ दि.११.३.२०२३ चे ०१.४० वा | सुधीर महादेवराव इंगोले वय ६० व्यवसाय म न पा फुटपाथ वसुली रा .बुधवारा खरकाडी पुरा अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी आज दि १०.३.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा वा पासुन मी गाडगेनगर परीसरामध्ये फुटपाथ वरील व्यवसायीकाकडुन वसुली करून रात्री अं १०.३० वा दरम्यान पॉलीटैक्नीक कॉलेज च्या गेटजवळील अंडा गाडीवाल्याकडुन १०रू ची पावती फाडली व पैसे वसुलीच्या बॅगमध्ये ठेवले मी दिवस २००० रू ची वसुली केली होती माझ्याकडे दोन वसुलीचे बुक होते बुक क्रमांक ७ व ८ असे होते एका बुकमध्ये ०१ते १०० पावत्या होत्या अमोल चौधरी यांचे कडुन पावती ची रक्कम वसुल केल्यानंतर त्याचे गाडीवर एक ग्राहक होता त्याने मला म्हटले की नकली पावती बुक घेवुन वसुली करत आहे असे म्हटले व त्या इसमाने फोन करून दुस-या इसमास नमुद ठीकानी बोलावुन घेतले दुसरा इसम गाडी घेवुन आला त्याचेकडे पांढ-या रंगाची अॅक्ट्रीव्हा गाडी होती त्या दोन्ही इसमांनी मला म्हटले की तुम्ही चंदु भोमरे नगरसेवक यांचेकडे चला असे म्हटले त्यांनी मला त्याचे गाडीवर बसवीले व मला नारायण नगरच्या गल्लीत घेवुन गेले व अंधारात माझ्या बॅग मधुन २००० रू जबरीने काढुन घेतले माझ्या गळयातील आय कार्ड तसेच पावती बुक क्र ७ काढुन घेतले त्यानंतर त्यांनी मला पंचवटी चौकात आणुन सोडुन दीले व मला धमकी दीली की तु जर इकडे वसुली करतांना दीसला तर तुला रक्त बंबाळ करून देइल असे म्हटले मला त्या इसमांनी थापडांनी मारहान केली त्या इसमांनी मला मारहाण करून माझ्या कडील २०००रू जबरीने काढुन घेतले त्याचे वय अं ४० ते ४२ वयोगटातील होते एका इसमाच्या अंगात प्रीन्टर काळया रंगाचा हाफ बाहीच्या शर्ट व काळया रंगाचा फुल पॅन्ट दुसरा या इसमाच्या अंगात गुलाबी रंगाचा हाफ बाहयाचा शर्ट क्रीर रंगाचा पॅट घातलेला होता त्याचेवर कार्यवाही होण्याकरीता तक्रार देत आहे हेच माझी जबानी रीपोर्ट असुन माझे सांगणे प्रमाणे लीहीला बरोबर आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

वाहनचोरी :—०२ (पान क्र ०४)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ४४७/२०२३ कलम ३७९ भादवी | अंबीका प्लायवुड समोरील उडडाण पुलाचे खाली अमरावती | घटना ता.वेळ दि .१०.३.२०२३ चे १३.०० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि .११.३.२०२३ चे १३.४० वा | शैलेश दिनेश मानकर वय ३० व्यवसाय शिक्षक रा . माधवराव तरसे यांचे घरी भाडयाने आय टी आय कॉलनी कांतां नगर अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतोवळी व ठीकानी मी यशोदिप ॲकॅडमी येथे शीक्षक म्हणुन काम करतो काल दि १०.३.२०२३ रोजी दुपारी ०१.०० वा दरम्यान माझे मामा मोरेश्वर मेश्राम रा मुळा ता देवरी जि गोंदीया यांचे नावे असलेली एम एच ३५ एक्स ५९५७ पॅशन प्रो काळया रंगाची सिल्वहर पटटा असलेली अंबीका प्लायवुड समोरील उडडान पुलाचे खाली र्पाकींग मध्ये ठेवली होती व यशोदीप ॲकेडमी येथे टयुशनला गेलो संध्याकाळी ०५.३० वा दरम्यान परत आलो असता दुपारी ठेवलेल्या ठीकानी दिसुन आली नाही .आजुबाजुला परीसरात शोध घेतला असता मीळुन आली नाही र्वणन एम एच ३५ एक्स ५९५७ पॅशन प्रो काळया रंगाची ज्याचा चेचीस क्र mblha१००awdhj७७९६५ व इंजीन क्र ha१०endhj६१३८७ अश्या वर्णनाची कुणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली हाच माझा जबानी रीपोर्ट माझे सांगणेप्रमाणे लीहीला वाचुन पाहीला बरोबर आहे वरून सदर चा गुल्हा दाखल केला. |
| २ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ११५/२३ कलम ३७९ भादवी | वालकट कम्पाउन्ड अमरावती | घटना ता.वेळ दि.०६/०३/२०२३ चे १७.०० वा ते दि. ११/०३/२०२३ चे १२.१५ वा<br><br>दा.ता.वेळ दि. ११/०३/२३ चे १२.३०वा | नितीन सुभाशराव डवरे वय ३८ वर्ष व्यवसाय मजुरी रा रोहणखेडा पो.स्टे नांदगावपेठ अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रारे आहे की यातील फिर्यादी यांने त्याची मोटर सायकल क्र. MH-२७ AK-२२९४ पँशन प्रो हिरो होन्डा कंपनीची लाल रंगाची काळा पट्टा असलेली जिचा चेचीस क्र MBLHA१०ENAGB१२६९२ इंजीन क्र HA१०ECAGB०६७१० किमंत अंदाजे ४०,०००/- रु दि.६/०३/२३ रोजी सायंकाळी १७.०० वा दरम्यान वालकट कम्पाउन्ड अमरावती येथे गाडीला चाबी लावुन उभी करुन दारु पिणे करीता गेले असता फिर्यादी हे परत आल्यावर त्यांनी ठेवलेल्या ठिकाणी सदरचे वाहन मिळुन आले नाही अशा फिर्यादीच्या जबानी रिपोट वरुण वपोनि सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला. |

स्त्री अत्याचार :—०१ (पान क्र ०५)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | राजापेठ अप क्रं- २६१/२३ कलम ३७६(२)(n),३१३, ४१७, ३२३,५०६ (ब) भादवी | अमरावती | घ.ता.वेळ - दि. ०२/३/२३ चे पुर्वी<br>दा.ता.वेळ - दि. ११/०३/२३ चे १८/०० वा. | एक महीला | १)अंकुश विनायक आठवले रा.- ह.मु. मनोहर नाईक यांच्या घरी शिवशक्ती नगर,गोपाल नगर अमरावती<br>२)एक महीला<br>३) विनायक आठवले रा.- सावरखेड ता. मोर्शी जि. अम. ४) अविनाश विनायक आठवले रा.- सावरखेड ता. मोर्शी जि. अम. | हकीकत अश्या प्रकारे आहे की, फीर्यादी व आरोप क्र. १ यांची दोन ते तिन वर्षा अगोदर फेसबुकवरुन ओळख झाली असुन त्यांची मैत्री होती आरोपी क्र. १ यांने फीर्यादीस गोपाल नगर अम. येथे मनोहर नाईक यांच्या घरी रुम भाड्याने करुन आरोपी क्र. १ व फिर्यादी हे सोबत राहत होते कालांतराने आरोपी क्र. १ याने फीर्यादीस लग्नाचे आमीश दाखवुन तिच्या सोबत अनेकवेळा शारीरीक संबध प्रस्तापित केले त्यामुळे आरोपी क्र. १ पासुन फीर्यादी गरोधर राहीली फी. हे गरोधर राहील्याचे पाहुन आरोपी क्र. १ याने जवरकर हॉस्पीटल राठी नगर अम. येथे फीर्यादीस नेवुन बळजबरीने गर्भपात केले त्या नंतर कालांतराने फीर्यादीने आरोपीस लग्ना बाबत वचारणा केली असता आरोपी फीर्यादीस उडवाउडवीचे उत्तर देत मारहाण करुन रुम सोडुन गेला वरुन फीर्यादी हे आरोपी क्र. १ च्या घरी जावुन आरोपी क्र. २ ते ४ यांना सांगीतले तर आरोपी क्र. २ ते ४ यांनी माझ्या मुलाचे नाव घेतले तर जिवाने मारुन टाकुअशी धमकी दिली नमुद फीर्यादीला आरोपी क्र. १ ने लग्नाचे खोटे आमीश दाखवुन शारीरीक संबध ठेवले गर्भपात केला मारहान करुन फसवनुक केली व आरोपी क्र. २ ते ४ यांनी फीर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली अश्या फीर्यादीच्या लेखी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

पळवुन नेणे :—०१ (पान क्र ०६)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | पिडीत इसम | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३४६/२०२३ कलम ३६३ भादवी | अमरावती | घ.ता.वेऴ दि ०९.०३.२०२३ चे ०४.०० वा<br>दा.ता.वेऴ दि ११.३.२०२३ चे ०२.१९ वा | नितीन भाष्करराव बुरघाटे वय ४७ धंदा कॅब्रीकेशन रा . संतोष भुवन गल्ली गाडगेनगर अमरावती | अज्ञात | सोहम भाष्करराव बुरघाटे वय १७ वर्ष | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी मी समक्ष पोलीस स्टेशनला हजर येवुन जबानी रीर्पोर्ट देतो की नमुद ठीकानी माझे परीवारासह राहतो मला दोन मुले असुन एक सार्थक वय १२ वर्ष व दुसरा सोहम वय १७ वर्ष हा गर्व्हमेंन्ट पॉली कॉलेज २ वर्षाला शीकतो दि ९.३.२०२३ चे सकाळी ०४.००वा मी माझे मुलगा सोहम चे बेड वर पाहले तर सोहम दिसला नाही तो कोणाला काहीही न सांगता घरून नीघुन गेला कारण दि ०८.३.२०२३चे संध्याकाळी ०७.०० वा दरम्यान आमचे गल्लीतील राहणारी गायकवाड बाइ हीने म्हटले की तीचे मालकीचा चहाचा खोका सोहम याने विकला आहे .म्हणुन आम्ही सर्वानी सोहम हयास त्या खोक्याबददल विचारपुस करण्यास सुरूवात केली कदाचीत त्यामुळे तो घरून गेला असावा त्याचेकडे मोबाइल नाही त्याचे वर्णन रंग सावळा बांधा सडपातळ उंची पाच फुट केस बारीक चेहरा गोल अंगात ब्लुयु जिन्स पॅन्ट ब्लुयु लांब बायाची टी शर्ट पायात स्लीपर चप्पल असे आहे तरी माझे मुलाचा शोध व्हावा म्हणुन रीपोर्ट देत आहे .हाच माझा जबानी रीपोर्ट वाचुन पाहीला माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे अशा फीर्यादीच्या जबानी रीपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

विश्वासघात :—०१ (पान क्र ०७)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३४९/२३ कलम ४२० . ६६ ड ऐ | छत्रपती शाहु नगर आशीयाड कॉलनी अमरावती | घ.ता.वेऴ दि ३०.१०.२०२२ चे पुर्वी<br>दा.ता.वेऴ<br>दि | गोपाल लगन्नथ कील्लेकर वय ५८ व्यवसाय नौकरी रा छत्रपती शाहु नगर आशीयाड कॉलनी | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी फीर्यादी हयाची एकुन १३,०००० ची फसवणुक झाल्या बाबत २२.११.२०२२ रोजी तक्रार सायबर पोस्टे ला तक्रार दीली आहे सदर तक्रार अर्जाची चौकशी दीली असता सदर ची रक्कम ऍमेझॉन पे वॉलेट मध्ये ट्रान्सफर करण्यात आले सदर सदर ट्रन्जेक्शन ची माहीती मीळण्या करीता नोडल ऑफीसर ॲमेझॅन ला पे ला मेल करण्यात आला आहे वरून सदरचा गुन्हा कलम ४२० ६६ ड आय टी ॲक्ट प्रमाणे दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | टी ॲक्ट | | ११.८.२०२३ चे | अमरावती | | |

सरकारी कामात अडथळा :—०१ (पान क्र ०८)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | राजापेठ अप क्र. २६२/२३ कलम ३५३,१८६ भादवी | **MIDC** परिसर अमरावती | घ.ता.वेळ दि. ११/०३/२३ चे ११/३० वा<br><br>दा.घ.ता.वेळ दि. ११/०३/२३ चे १९/३३ वा | पोनी राहुल लिबास आठवले शहर वाहतुक शाखा (पश्चिम) अमरावती श. | शेख आमिन नावाचा ईसम रा. जुनी वस्ती बडनेरा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेऴ व ठीकाणी यातील पोस्टे राजापेठ हद्दीत MIDC परीसरीमध्ये अवैधरित्या रेती वाहतुक करणारे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करणे करीता आमचे शासकीय वाहणाने पेट्रोलिंग करीत असतांना MIDC चौकमध्ये ट्रक क्र. MH२७ BX ३४६७ व MH २७ BX ७१८७ क्षमतेपेक्षा जास्त प्रमानात रेतीची वाहतुक करीत असतांना दिसुन आले वरुन फी. यांनी पोस्टे स्टापच्या मदतीने त्या वाहणाची व रेतीची खात्री करणे करीता दोन्ही वाहन चालकांना कागदपत्र पाहणीस मांगीतले तेव्हा तिथे ट्रक क्र.MH २७ BX ३४६७ चे वतीना एक ईसम समोर आला व म्हणाला की मै आमीन हु बडनेरा मे रहता हु और मेरा रेती का धंदा है, आपने जो गाडी पकडी है वो मेरी ही गाडी है,यही पर छोड दो वरुन त्यास समजावुन गाडी शहर वाहतुक शाखा येथे घेवुन जात असतांना एक ट्रक क्र. MH २७ BE ५२७९ रेतीने भरलेला MIDC च्या आत जात असतांना दिसला वरुन त्यास थांबवुन तो ट्रक सुद्धा शाहणिशा करणे करीता ऑफीसला घेवुन येण्यास सांगीतले असता पोको राहुल यांचा फीर्यादीला फोन आला त्यांनी माहीती दिली की सदरच्या वाहनचालकाने रेतीच्या ट्रकातील माल खाली करीत आहे आनी तो वाहन वाहतुक शाखा अम. येथे येण्यास तयार नाही वरुन फी.तेथे पोहचले असता तेवढ्यात शेख आमीन नावाचा व्यक्ती आमच्या जवऴ आला व फीर्यादीस एकदम ओरडुन उद्धटपणे बोलला की, आप मेरी गाडी कैसे क्या ऑपीस लेकर जाते हो मै देखता हु MIDC मे खडी गाडी वही खाली हो रही है.मैने उसका व्हीडीओ बनाया है,म वो व्हीडीओ सब जगह भेजकर आपने वो गाडी छोडी ऐसा बताकर आपकी बदनामी करुगा और आप बाकी गाडीयो पर कैसे कार्यवाही करते हो येभी मै देख लेता हु असे बोलुन ट्रक रस्त्यावर लावुन ट्रकची चाबी घेवुन गेला व गाडी घेवुन जात असलेल्या कर्मचारी पोहेकॉ हरिष बनं. १३१२ यांच्याशी सुद्धा उद्धटपणे वागल्यामुऴे नमुद आरोपीने शासकीय कामामध्ये अडथडा निर्माण करुन धाक दपट करुन आम्हाला शासकीय कामा पासुन परावृत्त करण्याच्या उद्देशाने धमकी देवुन शासकीय कामात अडथडा निर्मान केला असल्याने सदरचा गुन्हा दाखल केला. |

इतर :–०४ (पान क्र ०९)

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | चोरीस गेलेला माल | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३४८/२०२३ कलम ३८४ ,३८५, ३८६, ३८७, ३८८,३८९ ,५०६ ब ३४ भादवी | योगीराज अपार्टमेन्ट गोखले लेआउट फलॅट नं १ अमरावती | घ.ता.वेळ दि ११.३.२०२३ चे ०९.०० वा दा.ता.वेळ दि ११.३.२०२३ चे १७.५० वा | श्री सुभाष वासुदेवराव भुयार वय ६० रा ही एम व्ही रोड अमरावती | १ संतोष भिमराव कोलटके वय ४५ रा जसापुर आसरा ता भातकुली<br>२. एक महीला | | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी यातील फीर्यादी यांच्या योगीराज अपार्टमेंन्ट गोखले ले आउट फलॅट नं १ अमरावती येथे आरोपी कीरायेदार असुन त्यांनी फीर्यादीस मागील ४ महीण्यापासुन घरभाडे दीले व मागील २ महीण्याचे विदयुत बील भरले नाही त्यावरून नमुद घटना ता वेळी व ठीकानी यातील फीर्यादी नातेवाईकासह आरोपी राहत असलेल्या फलॅट वर गेले व त्यांनी आरोपी व्यक्तीनां घरभाडे मांगीतले असता दोन्ही आरोपीनी फीर्यादीशी उध्दटपणे बोलुन भाडे देत नाही तसेच फलॅट खाली करत नाही असे म्हटले व आरोपी क्र १ ने फलॅट खाली करून पाहीजे असेल तर २,२०,००० रू आणुन दे तेव्हाच सोडतो त्यावर फीर्यादी ने आरोपीस २०,०००रू दीले तरी आरोपी फलॅट सोडण्याचे मनस्थीतीत नव्हता व फीर्यादी ला आणखी पैसे मांगीतले तर आरोपी क्र २ ने फीर्यादीला खोटया बलात्काराचे गुन्हयात फसवीन व जिवानीशी खतम करीन तुझा पत्ता लागु देणार नाही अशी अशी धमकी दीली त्यावरून फीर्यादी आरोपीच्या कुत्याला घाबरला व पोस्टे ला हजर येवुन तोडी रीपोर्ट दील्या वरून सदर चा गुन्हा दाखल केला. |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३५०/ २०२३ कलम २८९, ५०४ भादवी | गोवींद नगर अमरावती | घ.ता.वेळ दि ११.३.२०२३ चे १०.०० वा<br>दा.ता.वेळ<br>दि.११.३.२०२३ चे | एक महीला | विक्रम लादे रा गोविंग नगर अमरावती | | यातील हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घता वेळी व ठीकानी नमुद फीर्यादी ही रूम भाडयाने पाहणे करीता आरोपी यांचे घरी गेली असता त्यांच घरातील पाळीव कुत्रा बांधलेला नसल्याने फीर्यादी यांनी आरोपीस म्हटले कुतरा चावत तर नाहीना असे म्हटले असता आरोपी याने नाही म्हटले तो चावत नाही फीर्यादी रूम पाहुन परत येत असता कुत्रा त्याचे अंगावर धावत येवुन डाव्या पायाला चावला त्या कारनावरून फीर्यादी यांनी म्हटले तुमचा कुत्रा कावरलेला आहे का असे विचारले असता सदर आरोपी याने आपला कुत्रा हयगइने बाळगुन फीर्यादी यांचा इलाज न करता नीघुन गेला व फीर्यादीचे प्रायव्हेट मेडी सर्टी वरन व जबानी रीपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल करून केला. |
| ३ | नागपुरी गेट अम अप क्र. १२५/२३ कलम ३,७ | इतवारा बाजार अमरावती | घ.ता.वेळ दि. ११/०३/२०२३ चे १३/०० वा. ते १४/४० | सरतर्फे वैभव गुलाबराव खैरकर वय ४० (पुरवठा निरिक्षक) व्यवसाय अन्न | १) अब्दुल राजीक अब्दुल माजीद वय ४८ रा. नुर नगर अम. २) फरार आरोपी मुकेश जगन्नाथ कोष्ठी रा. इतवारा बाजार मुकेश धान्य भंडारा अम. | प्लास्टीक चे सात कट्टे तांदुळ वजन २८०/ किलो व एक तिन चाकी | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील सरतर्फे फीर्यादी हे त्याचे स्टाफ सह इतवारा बाजार परिसर येथे भेट दिली असता एक तिन चाकी रिक्षा (कटला) मध्ये सात कट्टे तांदुळ एक इसम घेवुन जाताना आढळून आले सदर कटला चालक याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अब्दुल राजीक अब्दुल माजीद वय ४८ रा. नुर नगर अम. असे सांगितले सदर कटला मधील तांदुळ कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता सदर क्टला |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिवनावश्यक वस्तु अधिनियम | | वा.<br><br>दा.ता.वेऴ दि. ११/०३/२०२३ चे १८/५३ वा. | धान्य वितरण कार्यालय अम. | | कटला कि. अं. ८०००/- रु. | चालक याने सांगितले की मुकेश जनन्नाथ कोष्ठी याने सदर तांदुऴ हे राशन कार्ड धारक यांचे कडुन घेतल्याचे सांगितले व ते इतवारा ये़थे दुकानात नेत आहे असे सांगितले वरुन मुकेश जनन्नाथ कोष्ठी याने सदर तांदुऴ शासकिय असल्याचे तांदुऴ घेत असल्याचे निषन्न होत असल्याने फिर्यादी यांचे लेखी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |
| ४ | राजापेठ अप क्र. २६३/२३ कलम १४२ मपोका | आरोपी चे घरा जवऴ अंकुर नगर अमरावती | घ.ता.वेळ दि. ११/०३/२३ चे १८/०० वा<br>दा.घ.ता.वेऴ दि. ११/०३/२३ चे २०/५४ वा | सरतर्फे नापोकॉ दिनेश गोपालराव नांदे बनं. १३६१ गुन्हे शाखा अमरावती | मंगेश देवीदास गीरी वय- ३० रा.- अंकुर नगर कुंभारवाडा अमरावती | ---- | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील हद्दपार ईसम नामे मंगेश देवीदीस गीरी वय- ३ रा.- अंकुर नगर अम. यास मा. पो.उप. आयुक्त सा. पिरीमंडऴ २ अम. यांचे आदेश क्र. १५१९/२१ दि. १७/१२/२१ प्रमाने अमरावती शहर ग्रामिण परिसरातुन दि. १८/०२/२४ पावेतो हद्दपार केलेले असतांना तो उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लघन करुन विनापरवानगी अम. शहरात करन धुमधाम करीत असतांना घटनास्थळी समक्ष मिऴुन आला त्याचे सदरचे कृत्य क. १४२ मपोका प्रमाने अपराध होत असल्यान फार्यादीने सरकार तर्फे दिलेल्या रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

अकस्मात मृत्यु :—०३ (पान क्र ११)

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग. नं. व कलम | धटनास्थळ | मृतकाचे नाव | फिर्यादी | मरनाचे कारण | अकस्मात मृत्यचे विवरण | चौकशी अधीकारी नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | |
| १ | नागपुरी गेट अम. मर्ग क्र. ०५/२३ कलम १७४ जाफौ. | सौदागरपुरा अमरावती | शेख रशीद शेख जलील वय ३७ रा. सौदागपुरा अम. | नापोका अमोल म्हरसकोल्हे बन. २४३५ पो.ठाणे सोनेगाव नागपुर शहर | समजुन आले नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि. ११/०३/२३ रोजी सकाऴी ९/०० वा. ते २१/०० वा. पावेतो डिओ डयुटी असतांना पो.ठाणे सोनेगाव नागपुर शहर ये़थील नापोका अमोल म्हरसकोल्हे बन. २४३५ पो.ठाणे सोनेगाव नागपुर शहर येथील शेख रशीद शेख जलील वय ३७ रा. सौदागपुरा अम. यांचा एम्स हॉंस्पीटल येथे आजारात मरण पावल्याने दि. ०७/०३/२३ चा दाखल मर्ग क्र. ००/२०२३ कलम १४७ जाफो. ची मर्ग डायरी संपुर्ण कागदपत्रासह पो.स्टे. नागपुरी गेट अम.येथे आज दि. ११/०३/२३ रोजी पो.स्टे. ला आणुन दिल्याने सदरचा मर्ग पिआय यांचे आदेशाने दाखल करुन तपासात घेतला. | मसपोनी वैशाली चव्हाण पो.स्टे. ना. गेट अम. |
| २ | नागपुरी गेट अम. मर्ग क्र. ०६/२०२३ कलम १७४ जाफौ. | जुने डिप्टी ग्रांउड फ्रेन्डस हायस्कुल समोर वलगाव रोड अम. | देवीदास अन्नाजी बांगर वय अंदाजे ६५ रा. उपराई पो.स्टे. खल्लार जि. अम. | दशरथ मोतीरामजी शिंदे वय ७२ रा. पो.स्टे वलगाव अम. | समजुन आले नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि. १०/०३/२३ रोजी पो.स्टे. ला तपास मदत डयुटी सकाऴी ९/०० वा. ते २१/०० वा. पावेतो डयुटी असतांना डिओ पोउपनी विधाते यांना त्यांचे मोबाईल यावर माहिती मिऴाली वरुन घटनास्थऴी पो.स्टाफ सह भेट देवुन संपुर्ण माहिती साना क्र. ५६/२३ वर नोंद करण्ययात आली. वरुन पुसदा गावाचे पोलीस पाटील राजुभाउ कोकरे | सपोउपनी मुर्हेकर बन. ७६१ पो.स्टे. ना. गेट अम. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | यांचे व्हाटअप वर नमुद इसमाचे फोटो पाठविले ते फोटो ओळखुन त्याचे जावाई दशरथ मोतीराम शिंदे वय ७२ रा. पुसदा अम. यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तापासात घेतला. | |
| ३ | ´वलगांव मर्ग न. १०/२०२३ कलम १७४ जा. फौ. | राहते घरी ग्राम कांमुजा ता. जि. अमरावती<br><br>घटणा ता. वेळ- दि. ११/०३/२०२३ १०/१० वा<br><br>माहीती ता. वेळ दि. १०/१०/२०२३ ११/३० वा<br><br>दाखल ता. वेळ दि. ११/०३/२०२३ चे १८/०९ | मृतक नामे संकेत बबनराव व-हाडे वय ३१ वर्ष रा. ग्राम कांमुजा | विवेक गोपालराव व-हाडे वय ३१ वर्ष रा. ग्राम कांमुजा | **Brought death** | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी नामे विवेक गोपालराव व-हाडे वय ३१ वर्ष रा. ग्राम कांमुजा फिर्यादीयांच्या शेजारी त्यांचा सख्खा चुलत भाउ मृतक नामे संकेत बबनराव व-हाडे वय ३१ वर्ष रा. ग्राम कांमुजा त्याचे कुटुबासह राहत होता आज दिनांक ११/३/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा दरम्याण फिर्यादीच्या मोबाईलवर त्यांची नातेवाईक यांनी कॉल करुन माहीती दिली की माझे नातेवाईक संडासला गेले अद्याप पर्यन्त बाहेर आले नाही तुम्ही लवकर या वरुन फिर्यादी यांचा सख्खा चुलत भाऊ संकेत बबनराव व-हाडे यांच्या घरी गेलो असता तेथे आमचा मित्र नामे करण सुधाकरराव आमझरे हजर होता त्याच्या मदतीने आम्ही संडासचा दरवाजा वाजविला नंतर दरवाजा न उघडल्याने आम्ही दरवाजा तोडुन आत गेलो असता संकेत हा संडासात पडलेला दिसला आम्ही त्याला उपचारा करीता चार चाकी वाहणाने जिल्हा समान्य रुग्णालय अमरावती येथे आणले डॉ. सा. यांनी सकेत यास तपासणी करुन मृत घोषीत केले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला प्रेत अंतविधी करीता नात्यावाईकांच्या ताब्यात देण्यात आले | ASI बलराम भाष्कर बं नंबर ९१६ पोलीस स्टेशन वलगांव अमरावती शहर |

## जुगार -०२ (पान क्र १३)

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | बडनेरा अप.नं. १९८/२३ कलम १२ अ महा.जुगार कायदा | जुगार | नगदी ३६० रु. १ ते १० आकडयाच्या वरली मटक्याचे चिठया एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण ३६५/- रू. चा माल | उत्तमसरा बडनेरा | दि.११.०३.२०२३ चे १५.३० वा | दि ११.०३.२०२३ चे २१.०६ | ना.पो.का. मंगेश परिमल, ब.न. ३३४ पो.स्टे. बडनेरा.अम. मो. नं. ९०७५१७२२१९ | ज्ञानेश्वर रामदास मेश्राम वय-४५ वर्ष रा. उत्तमसरा बडनेरा | ना.पो.का. मंगेश परिमल, ब.न. ३३४ पो.स्टे. बडनेरा.अम. मो. नं. ९०७५१७२२१९ | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी ३६० रु. १ ते १० आकडयाच्या वरली मटक्याचे चिठया एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण ३६५/- रू. चा माल चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | नागपुरी गेट अम. | अप क्र. १२६/२३ कलम १२ (अ) मजुका | अवैद्दरित्यया जुगार | १)वरली मटक्याचा जुगार खेळाचे नगदी १०७५/- रु. २) वरली मटक्याचा चिठ्या १ ३) एक बॉल पेन कि. ५/- रु. असा एकुण १०८०/- रु. चा माल. | अँकेडमी हायस्कुल चे मागे प्रांगणात अम. | दि. ११/०३/२०२३ चे १९/१५/ वा. ते १९/५० वा. दरम्यान | दि. ११/०३/२०२३ चे २०/२३ वा. | सरतर्फ पोहेका सलीम शेख अयुब शेख बन ४६४ पो.स्टे. ना. गेट अम. | १)प्रविण विजयराव नागापुरे् वय ३० रा. सुप्रोद्य चौक अम. २) चंदु सुभाषराव वैद्द वय ३२ रा. सौदागरपुरा अम. | मसपोनी वैशाली चव्हाण पो.स्टे. ना. गेट अम.<br><br>वेळ - २०/३० वा. | हकीकत अशा प्रकारे आहे ` की यातील नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याने पोलीस स्टाफ व पंचासमक्ष मिळालेल्या गुप्त माहितीवरुन जुगार रेड केली असता यातील नमुद आरोपीन कडुन १)वरली मटक्याचा जुगार खेळाचे नगदी १०७५/- रु. २) वरली मटक्याचा चिठ्या १ ३) एक बॉल पेन कि. ५/- रु. असा एकुण १०८०/- रु. चा माल मिळुन आला. वरुन नमुद आरोपीचे कृत्य कलम १२(अ) मजुका प्रमाणे होत असुन फिर्यादी यांचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## प्रोव्हीबीशन -०१ (पान क्र १४)

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | वलगांव अप क्र. ९७/२०२३ कलम ६५ (अ), ६५(ई) म.द. का. सह कलम १०९ भा. द. वि. | ०१ | प्रोव्हीशन्ा अवैध्यरित्या दारु विक्री करीता वाहुन नेणे | प्रोव्हीशन्१) ४०० नग देशी दारु बॉबी संत्रा ९० एम. एल च्या सिलंबद पावट्या प्रत्येकी ४०/- रु ज्याचा बॅंच नंबर ७४३ मार्च २०२३ असा असुन एकुण किमत १६,०००/- रुपयाचा प्रोव्ही माल २) प्रोन्ही माल वाहतुन करण्या करीता वापरलेली एक दुचाकी access-१२५ कंपणीची क्र. एम.एच २७-डी. सी -०४१२ निळ्या रंगाची वाहान कि.अ.९०.०००/- रुपये असा एकुण १,०,६०००/- रु चा मुद्दे माल | ग्राम पुसदा रेल्वे फाटका जवळ | दि.११/०३/२०२३ चे १४/१० वा | दि. ११/०३/२०२३ चे १६/५५ वा | सरतर्फे नापोका दिपक महादेवराव सुंदरकर ब. न. १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | १) श्रीकृष्ण उर्फ शेकर गोडुजी इंगळे वय ४३ वर्ष रा. वार्ड क्र. ६ ग्राम शिराळा ता. जि. अमरावती | ASI बलराम भाष्कर बं नंबर ९१६ पोलसी स्टेशन वलगांव | हकीकत अशा प्रकारे आहे. की नमुद घटणा ता. वेळी व टीकाणी यातील फिर्याजी ल पो. स्टॉंप गुन्हे शाखा अमरावती शहर मा. पो. नि. सा. गुन्हे शाखा यांचे आदेशाने पोलीस आयुक्तालय हद्दीत खाजगी वाहणाने पेट्रोलिंग करीत असतांना गुप्तबातमीदारा कडुन खात्री लायक माहीती मिळाली की एक ईसम निळया रंगाच्या access-१२५ दु. चाकी वाहणावर अवैघ्य रित्या देशी दारुचा माल धेवुन ग्राम शिराळा कडुन ग्राम पुसदा रेल्वे फाटा या रोडने जात आहे. अशा माहीती वरुन सापळा रचुन थांहलो माहीती प्रमाणे एक ईसम दुचाकी access-१२५ कंपणीची क्र. एम.एच २७-डी. सी -०४१२ निळ्या रंगाच्या गाडीवर प्लॉंस्टीक पोत्या मध्ये काहीतरी घेवुन संशयीतरित्या येत असतांना दिसुन आला पो. स्टॉंपच्या मदतीने थांबवुन त्याच्या गाडीवर असलेल्या प्लॉंस्टीक पोत्याची पाहणी केली असता पोत्या मधये देशी दारुत्या ४ बॉंक्स दिसुन आले त्या ईसमास ताब्यात घेवुन पंचा समक्ष ईसमास नाव गाव विचारले असता त्यानेत्याचे नाव श्रीकृष्ण उर्फ शेकर गोडुजी इंगळे वय ४३ वर्ष रा. वार्ड क्र. ६ ग्राम शिराळा ता. जि. अमरावती असे सांगतीले देशी दारुची वाहतुन करण्या बाबत पासपरवाना विचारला असता त्याचे जवळ कोणताही पास परवाना नव्हता त्याच्या ताब्यातुन वाहाणासह जप्ती |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पंचनाम्याप्रमाणे ४०० नग देशी दारु बाँबी संत्रा ९० एम. एल च्या सिलंबद पावट्या प्रत्येकी ४०/- रु ज्याचा बँच नंबर ७४३ मार्च २०२३ असा असुन एकुण किमत १६,०००/- रुपयाचा प्रोव्ही माल २) प्रोन्ही माल वाहतुन करण्या करीता वापरलेली एक दुचाकी access-१२५ कंपणीची क्र. एम.एच २७-डी. सी -०४१२ निऴ्या रंगाची वाहान कि.अ.९०.०००/- रुपये असा एकुण १,०,६०००/- रु चा मुद्दे माल जप्त केला नमुद ईसमास ताब्यात घेतले असता सदर प्रोव्ही माला बाबत विचारपुस केली असता त्याने तो अतुन रामकृष्ण हरडे रा. ग्राम शिराळा ता. जि. अमरावती याचा असुन त्याच्या कडे ५०० प्रमाणे रोजदारीने असुन सदर माल गावोगावी देशी दारु बॉक्स टाकण्या करीता तो मला त्याची गाडी देत असुन सदर गाडी ही अतुन हरडे याच्या मालकीची ओ़. अतुन हरडे याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही सदर आरोपीचे कृत्य कलम ६५ (अ) (ई) म.द. का प्रमाणे होत असल्याने अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला |